मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 31 जानेवारी 2025 | पान- 1


# चिखली-कुदळवाडीतील व्यापारी रस्त्यावर; 3 तास रस्त्यावर ठिय्या!

## वाहतूक कोंडी अन् तणावाचे वातावरण : प्रशासन कारवाईवर ठाम; नागरिकांच्या भावनांचा आदर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने चिखली-कुदळवाडीतील अनधिकृत भंगार दुकानांवर गुरुवारी (दि.३०) कारवाईला सुरवात केली. मात्र, या कारवाईला स्थानिक व्यापाऱ्यांनी विरोध करत देहू-आळंदी रस्ता अडवल्याने रस्त्यांवर दोन्ही बाजूने वाहनांच्या रांगा लागल्या. सुमारे तीन तास नागरिकांनी रस्त्यावर ठाण मांडले. या भागात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पिंपरी पालिका , पोलीस प्रशासन,राज्य राखीव बलाचे पोलीस, पालिकेचे सुरक्षारक्षक या ठिकाणी तैनात होते.



पिंपरी चिंचवड येथील चिखली, कुदळवाडीतील भंगार दुकाने, गोदामे, कंपन्या, हॉटेल, वर्कशॉप्स, बेकरी अशी अनधिकृत बांधकामे आणि पत्राशेड उभारलेल्या 4 हजार 300 दुकाने, पत्रा शेड, टपऱ्या यांना महापालिकेने नोटिसा बजावल्या आहेत. आजपासून महापालिकेने कारवाईला सुरुवात केली होती सकाळपासूनच याबाबतची तयारी सुरू होती महापालिकेचे अतिक्रमण पथक या भागात दाखल झाल्याची कोण कोण नागरिकांना लागतात नागरिकांनी रस्त्यावर उतरत आंदोलन छेडले आहे. त्यामुळं मोठी वाहतुक कोंडी निर्माण झाली. बंदोबस्तासाठी पोलिस परिसरात दाखल झाले. महापालिकेने पाठवलेल्या नोटीसनंतर पिंपरी-चिंचवड लघु उद्योजक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह पवारवस्ती, चिखली येथे बैठक पार पडली. या बैठकी दरम्यान उद्योजकांनी आंदोलनाचा इशारा दिला होता.

मोठी गोदामे, वारंवार उद्भवणाऱ्या आगीच्या घटना यामुळे चिखली, कुदळवाडी परिसर संवेदनशील झाला आहे. या भागातील अनधिकृत बांधकामे दुकाने कळीचा मुद्दा ठरत आहे.चिखली, कुदळवाडी, पवारवस्ती, जाधववाडी या औद्योगिक परिसरात सुमारे पाच ते सात हजार लघुउद्योजक आहेत. या ठिकाणी हजारो कामगार काम करतात. मात्र निमुळते रस्ते, अरुंद झालेल्या वाटा, दाटीवाटीने उभारण्यात आलेले अनधिकृत पत्र शेड आणि वारंवार भंगार व्यवसायिकांच्या दुकानांना लागणाऱ्या आगीच्या घटना यामुळे येथील अनधिकृत पत्राशेड रडारवर आले. नागरिकांकडून या घटना संदर्भात तक्रारींचा पाढा वाचला जाऊ लागला. आगीच्या घटनांमुळे प्रदूषणाचे प्रमाण देखील वाढत आहे हाच मुद्दा घेत पिंपरी पालिकेने या ठिकाणी कारवाईला सुरुवात केली.

### कारवाई थांबणार नाही : महापालिका प्रशासन

» पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिक्रमण विभाग उपायुक्त मनोज लोणकर म्हणाले की, कुदळवाडी - चिखली परिसरामध्ये अनधिकृतपणे पत्राशेड उभारून व्यवसाय करत असणाऱ्या व्यापाऱ्यांना महापालिकेच्या वतीने नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. कुदळवाडी चिखली परिसरामध्ये गेल्या काही वर्षांमध्ये आगीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. कायदेशीरित्या या व्यापाऱ्यांना अनधिकृत बांधकामा संदर्भात नोटीसा दिलेल्या आहेत. पंधरा दिवसांची त्यांना मुदतही देण्यात आलेली होती. या मुदतीत त्यांनी अनधिकृत बांधकाम काढावे अशी सूचना करण्यात आलेली आहे. महापालिकेने या भागातील 4 हजार 300 व्यापाऱ्यांना अनधिकृत बांधकामा संदर्भात नोटीसा देऊन पंधरा दिवसात अनधिकृत बांधकाम हटवण्यात संदर्भात कळविण्यात आले होते. मात्र ही बांधकामे हटवण्यात आलेली नाही. नागरिकांचा उद्रेक लक्षात घेऊन तूर्तास कारवाई स्थगित ठेवण्यात आली . व्यापारी आणि पालिका प्रशासन यांची संयुक्त बैठक होऊन या संदर्भात पुढील निर्णय घेतला जाईल.

---

# नळकनेक्शन तोडणीबाबतचा वारंवार येणारा 'SMS' फसवणूकीचा!

## नागरिकांनी फ्रॉड 'एसएमएस'ला बळी पडू नये : महानगरपालिकेचे नागरिकांना आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरामध्ये सध्या ज्या नागरिकांची पाणीपट्टी थकीत आहे अशा मालमत्तेचे नळकनेक्शन तोडण्याची कारवाई सुरू आहे. महापालिकेच्या माध्यमातून याबाबत नागरिकांना थकीत पाणीपट्टी भरण्याचे वेळोवेळी 'एसएमएस' द्वारे व इतर माध्यमातून आवाहन करण्यात येत आहे. परंतू, शहरात नागरिकांचे आज रात्री 9 वाजता नळकनेक्शन तोडण्यात येईल, अशा आशयाचे देवेश जोशी, महापालिका अधिकारी या नावाने व 9309445824/9325848115 या मोबाईल क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहनपर फसवणूक करणारा 'एसएमएस' पाठविण्यात येत आहे. असे 'एसएमएस' हे नागरिकांची फसवणूक करणारे असून याकडे नागरिकांनी दुर्लक्ष करावे. असे महानगरपालिकेकडून आवाहन करण्यात आले आहे.

### कोणत्याही लिंकद्वारे कोणतेही ॲप्लिकेशन मोबाईलमध्ये डाऊनलोड करु नका!

तुमच्या माहितीमध्ये बदल आहेत, तुम्ही माहिती बदल करण्यासाठी सदर ॲप्लिकेशन डाऊनलोड करण्यासाठीचे एसएमएस तुमच्या व्हाट्सअपवरती येत आहेत. तरी त्याप्रकारच्या लिंक, ॲप्लिकेशन डाऊनलोड न करता त्याकडे दुर्लक्ष करावे. आपणास आपल्या माहितीबाबत, पाणीपट्टीबाबत कोणत्याही प्रकारच्या शंका असल्यास महानगरपालिकेच्या ८८८८००६६६६ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा. असे आवाहन करसंकलन विभागाद्वारे करण्यात आले आहे.



“ महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाकडून पाणीपट्टी वसुलीची मोहिम सुरु करण्यात आली आहे. नागरिकांना करसंकलन विभागाकडून थकीत पाणीपट्टी भरण्याचे अधिकृत क्रमांक व सिस्टिमवरुन एसएमएस करण्यात येत आहेत. आपणास कधीही कोणत्याही मोबाईल क्रमाकांवरुन पाणीपट्टी भरण्याचे आवाहन करण्यात येत नाही. तरी नागरिकांनी अशा क्रमांकावरुन आलेल्या एसएमएस कडे दुर्लक्ष करुन आर्थिक फसवणूक होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**- अविनाश शिंदे, सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

# शहरातील 15 रस्ते होणार 'सुपर फास्ट'

## 'मिशन 15'अंतर्गत हाती घेण्यात आलेली प्रमुख रस्त्यांची कामे 90 टक्के पूर्ण

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेने हाती घेतलेल्या 'मिशन 15'अंतर्गत शहरातील महत्त्वाच्या प्रमुख रस्त्यांची कामे जवळपास 90 टक्के पूर्ण झाली आहेत. या रस्त्यांमुळे आता शहरातील वाहतुकीचा वेग वाढणार असून, या रस्त्यांवर यापुढील काळात खोदाई करण्याची कोणतीही परवानगी दिली जाणार नसल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

शहरातील रस्त्यांची अवस्था आणि खड्डे यासंदर्भात सातत्याने चर्चा होते. लोकप्रतिनिधींनी शहरातील रस्त्यांच्या परिस्थितीबाबत नाराजी व्यक्त केली होती. ही परिस्थिती बदलण्यासाठी महापालिकेने ज्या रस्त्यांवर सर्वाधिक वर्दळ असते अशा 15 रस्त्यांच्या सुधारणांची कामे मिशन 15 अंतर्गत हाती घेतली होती.

त्यात प्रामुख्याने या प्रमुख रस्त्यांवरील खराब झालेल्या



रस्त्याची डागडुजी करून त्यावर डांबरीकरण करण्यात येत आहे. या सर्व रस्त्यांची कामे आता अंतिम टप्प्यात असून, किरकोळ कामे पूर्ण झाली की आठवडाभरात शंभर टक्के काम पूर्ण होईल.

**ही कामे झाली पूर्ण**

नगर रस्ता - पर्णकुटी चौक ते वाघोली बकोरी फाटा

सोलापूर रस्ता - वानवडी चौक ते आकाशवाणी मांजरी चौक

मगरपट्टा रस्ता - मगरपट्टा चौक ते खराडी बायपास चौक

पाषाण रस्ता - पुणे विद्यापीठ चौक ते पाषाण बावधन सर्कल चौक

बाणेर रस्ता - पुणे विद्यापीठ चौक ते सदानंद हॉटेल चौक

संगमवाडी रस्ता - सीओईपी चौक ते पर्णकुटी चौक

विमानतळ व्हीआयपी रस्ता - पुणे विमानतळ ते गुंजन चौक

कर्वे रस्ता - खंडोजी बाबा चौक ते वारजे चौक

पौड रस्ता - पौड फाटा चौक ते चांदणी चौक

सातारा रस्ता - स्वारगेट चौक ते गुजरवाडी चौक

सिंहगड रस्ता - लक्ष्मी मंदिर चौक ते नांदेड सिटी चौक

बिबवेवाडी रस्ता - पुष्पमंगल चौक ते अप्पर बस डेपो चौक

नॉर्थ मेन रस्ता - कोरेगाव पार्क पेट्रोल पंप ते ताडीगुप्ता चौक

गणेशखिंड रस्ता - सीओईपी चौक - पुणे विद्यापीठ चौक

छत्रपती शिवाजी-बाजीराव रस्ता - स्वारगेट चौक ते शिमला ऑफिस चौक शनिवारवाडा.

### एका महिन्यात काम पूर्ण

» एका महिन्याच्या कालावधीत पथ विभागाने प्रमुख 15 रस्त्यांच्या डागडुजीचे काम पूर्ण केले आहे. एकूण 92 किलोमीटरच्या रस्त्यांवर 60 हजार 772 चौरस मीटरचे डांबरीकरण करण्यात आले आहे. यासाठी 11 हजार 143 मेट्रिक टन डांबराचा वापर करण्यात आला आहे, तर काही महत्त्वाच्या चौकांमध्ये थर्मोप्लास्टिक पेंटचा वापर करून डांबरीकरण करण्यात आल्याची माहिती पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी दिली.

"'मिशन 15'अंतर्गत शहरातील सर्वाधिक वाहनांची सर्वाधिक वर्दळ असलेल्या 32 रस्त्यांची निवड करण्यात आली होती. यापैकी पहिल्या टप्प्यात 15 रस्ते विकसित करण्याचे काम पूर्ण होत आले आहे. मुख्य रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजविण्यात आले, चेंबर समपातळीवर आणले, डांबरीकरण केले. त्यामुळे या रस्त्यांवरील वाहतूक सुरळीत होण्यास मोठी मदत होईल. दुसऱ्या टप्प्यात उर्वरित 17 रस्त्यांची कामे केली जातील. काम झालेल्या रस्त्यांवर खोदाई करता येणार नाही.

- अनिरुद्ध पावसकर, पथ विभागप्रमुख, पुणे महापालिका.

# प्रशासन आणि नागरिक सुसंवाद वाढीसाठी लोकशाही दिन कार्यक्रम

## अतिक्रमणामुळे पुलाच्या लोकार्पणास विलंब : सात वर्षांनंतरही पूल वाहतुकीस खुला नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी शासनाकडून लोकशाही दिन राबविला जातो. या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच पालिका प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद वाढीसाठी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन घेण्यात येणार आहे. तसे परिपत्रक आयुक्त शेखर सिंह यांनी सामान्य प्रशासन विभागाला काढले आहे.



लोकशाही दिन अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. पालिका अतिरिक्त आयुक्त (१) यांच्याकडे फेब्रुवारी, मे, ऑगस्ट आणि नोव्हेंबर अशा चार महिन्यांचा कालखंड सोपवण्यात आला आहे. अतिरिक्त आयुक्त (२) यांच्याकडे मार्च, जून, सप्टेंबर आणि डिसेंबर यांच्या चार महिन्यांची जबाबदारी असेल. तर, अतिरिक्त आयुक्त (३) यांच्याकडे एप्रिल, जुलै, ऑक्टोबर आणि जानेवारी अशा चार महिन्यांचे अध्यक्षपद असेल.

नागरी सुविधा केंद्राचे विभागप्रमुख हे लोकशाही दिनाचे समन्वय अधिकारी असतील. प्रशासकीय कामकाजाच्या अनुषंगाने आवश्यक तरतुदींचा अंतर्भाव करायचा असल्यास अथवा निर्णय घ्यायचे असल्यास त्याकरीता समन्वय अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. लोकशाही दिनाची माहिती नागरिकांना उपलब्ध करून देणे, प्राप्त निवेदनावरील कार्यवाहीचे विविधस्तरावरील संनियंत्रण करण्यासाठी समन्वय अधिकाऱ्यांमार्फत आज्ञावली विकसीत केली जाणार आहे. समन्वय अधिकाऱ्यांमार्फत लोकशाही दिनाकरिताचे अर्ज उपलब्ध करून देण्यात येतील.

तसेच, अर्ज नागरी सुविधा केंद्राच्या बाहेर लावण्यात येतील. समन्वय अधिकाऱ्यांमार्फत प्रत्येक महिन्याला कार्यक्रमाचे स्थळ आणि वेळ निश्चित करून त्याबाबत नागरिकांना विविध माध्यमांद्वारे कळवले जाणार आहे.

### अर्जासोबत जोडा ही कागदपत्रे

» सारथी व जनसंवाद सभेत तक्रार केल्यास टोकन क्रमांक अथवा संदर्भ क्रमांकाची प्रत अर्जासोबत सोडावी. दाखल तक्रारींबाबत संबंधित विभागाकडून अथवा क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या उत्तराची प्रत जोडावी. तसेच, लोकशाही दिनाकरीता निश्चित केलेले स्थळी आणि वेळी अर्जदाराने अर्जासह उपस्थित राहावे. विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस आधी दोन प्रतींत समन्वय अधिकाऱ्यांकडे जमा करावा. प्रत्यक्ष लोकशाही दिनी अर्ज सादर करता येणार नाही. प्रकरण थेट महापालिका कार्यालयाशी संबंधित असेल तर लोकशाही दिनातील टोकन क्रमांक व त्याची प्रत आवश्यक राहील, असे आवाहन पालिकेने केले आहे.

### हे अधिकारी उपस्थित राहतील

» महापालिका अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या लोकशाही दिनास जिल्हाधिकारी यांच्यावतीने अपर जिल्हाधिकारी वा निवासी उपजिल्हाधिकारी, वाहतूक शाखेतील वरिष्ठ पोलिस अधिकारी, महापालिकेच्या विभागांचे विभागप्रमुख तसेच प्रशासकीय आवश्यकतेनुसार लोकशाही दिन समन्वयक अधिकाऱ्यांनी आमंत्रित केलेले अधिकारी या लोकशाही दिनास हजर असतील.

# प्रदूषण करणाऱ्यांवर शोधपथकाची नजर

## हवा, पाणी प्रदूषण करून पर्यावरण उल्लंघन करणाऱ्यांवर होणार कारवाई; तब्बल एका महिन्यात 20 लाख 44 हजार दंड वसूल

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील कचरा जाळणे, नदी-नाल्यात रासायनिक, सांडपाणी सोडणे, नैसर्गिक नदी-नाल्यात राडारोडा टाकणे यासह पर्यावरण नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर महापालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे वॉच ठेवण्यात येत आहे. नदी-नाल्यात बांधकाम राडारोडा टाकणारे, उघड्यावर कचरा टाकून जाळणारे, यांच्यावर पथकाकडून दंडात्मक कारवाई केली आहे. संबंधितांवर महापालिकेच्या उपद्रव शोधपथकाद्वारे आतापर्यंत महिन्यात २० लाख ४४ हजार ९२० रुपये दंड वसूल केला आहे.



शहरातील पवना, इंद्रायणी आणि मुळा नदी, नैसर्गिक ओढे-नाल्यांचे प्रदूषण करणाऱ्यांवर, नदी, नाल्यासह रस्त्यांच्या कडेला राडारोडा टाकणाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे, वायू व जलप्रदूषणासह पर्यावरणास हानी पोहोचवणाऱ्या दोषींवर दंडात्मक कारवाई जोरदार सुरू आहे. याकरिता महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडून दोन खासगी एजन्सीची नेमणूक केली आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी महापालिकेने धडक कारवाई सुरू केली आहे. शहरातील नदी व नाल्यात भराव बांधकाम राडारोडा टाकला जातो. सार्वजनिक ठिकाणी पदपथ, रस्ते, मोकळ्या जागेत कचरा टाकला जातो. घरात साचलेला कचरा पिशवीत भरून भिरकावून रस्ते व नाल्यात फेकून दिला जातो. परिसर अस्वच्छ ठेवला जातो, रस्ते व पदपथावर घाण केली जाते. चालू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी वायू व ध्वनिप्रदूषण केले जाते. त्यामुळे आजूबाजूच्या रहिवाशांना प्रचंड त्रास होतो. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, लघुशंका करणे, सार्वजनिक सभा व समारंभ संपल्यानंतर साफसफाई न करणे, महापालिकेच्या सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण करणे, व्यावसायिक आस्थापनेमार्फत कचरापेटी न ठेवणे, मेडिकल वेस्ट सामान्य कचऱ्यामध्ये किंवा उघड्यावर फेकणे, कचरा जाळणे, बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर करणे, मोकळ्या जागेत कचरा जमा होणे, डास उत्पत्ती स्थानाची निर्मिती करणे, लघुउद्योजक किंवा कारखानदारामार्फत रासायनिक सांडपाणी प्रकिया न करता थेट नाल्याद्वारे नदीत सोडणे असे प्रकार केले जात आहेत.

> हवा, पाणी, प्रदूषण करण्यासह नदी व नाल्यात राडारोडा टाकणारे, उघड्यावर कचरा टाकण्यांवर कारवाई सुरू आहे. महापालिकेने दोन खासगी पथके तैनात केली आहेत. बेशिस्त नागरिक व आस्थापनांवर कारवाई सुरू आहे. दंड केल्यानंतर संबंधितांना महापालिकेची रितसर पावती दिली जाते. पुन्हा नियमभंग न करण्याबाबत त्यांना जागृत करण्यात येते. पुन्हा त्या व्यक्ती किंवा आस्थापनेकडून नियमभंग केल्यास फौजदारी गुन्हा दाखल करणार आहे.
>
> - संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पर्यावरण विभाग, महापालिका

त्या संबंधित व्यक्ती, बांधकाम व्यावसायिक, विविध ठेकेदार, कारखानदार, लघुउद्योजक, दुकानदार, व्यावसायिकांवर दंडात्मक कारवाई केली जात आहे.

त्यासाठी महापालिकेने शुभम उद्योग आणि सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा. लि. या दोन एजन्सीचे पथक नेमण्यात आले आहे. एफएफएसच्या जमावासह या एजन्सींची चार पथके शहरात दिवस-रात्र कारवाई करत आहेत. गेल्या तीन महिन्यांपासून ही कारवाई करण्यास सुरू आहे.

शुभम उद्योगच्या पथकाने आत्तापर्यंत ४२१ नागरिक व आस्थापनांवर कारवाई करीत ११ लाख ३५ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे, तर सैनिक इंटेलिजन्सच्या पथकांकडून २९१ नागरिक व आस्थापनावर कारवाई करत ९ लाख ९ हजार ६०० रुपये दंड वसूल केला आहे. असा एकूण २० लाख ४४ हजार ९२० रुपये दंड जमा करण्यात आला आहे. दंड केल्यानंतर संबंधितांकडून पुन्हा असे करणार नाही, असे लिहून घेतले जात आहे. पथकाकडून पुन्हा नियमभंग न करण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत. वारंवार बेशिस्तपणा करणाऱ्या नागरिक व आस्थापनावर फौजदारी गुन्हे दाखल केले जाणार आहेत.

# लघुउद्योजकांवर कारवाईची टांगती तलवार; महापालिकेच्या नोटीसमुळे उद्योजक आंदोलनाच्या तयारीत

## उद्योजकांना मिळाला 15 दिवसांचा अल्टिमेटम, लघुउद्योजकांना नोटीस बजावून अनधिकृत बांधकामे हटवण्याचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

औद्योगिकनगरीमध्ये विविध समस्यांनी त्रस्त असलेल्या लघुउद्योजकांवर अनधिकृत कारवाईचे संकेत दिले आहेत. महापालिकेने चिखली, कुदळवाडी, पवारवस्ती, जाधववाडी या औद्योगिक परिसरातील लघुउद्योजकांना नोटीस बजावून अनधिकृत बांधकामे हटवण्याचे आवाहन केले आहे. १५ दिवसांत आपली बांधकामे काढून घेण्याविषयी महापालिकेने कळवले आहे.



औद्योगिकनगरीमध्ये विविध समस्यांनी त्रस्त असलेल्या लघुउद्योजकांवर अनधिकृत कारवाईचे संकेत दिले आहेत. महापालिकेने चिखली, कुदळवाडी, पवारवस्ती, जाधववाडी या औद्योगिक परिसरातील लघुउद्योजकांना नोटीस बजावून अनधिकृत बांधकामे हटवण्याचे आवाहन केले आहे. १५ दिवसांत आपली बांधकामे काढून घेण्याविषयी महापालिकेने कळवले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेले उद्योग बंद पडले तर अनेकांचा रोजगार बुडेल, अशी भावना उद्योजक व्यक्त करत आहेत. तसेच ही कारवाई थांबवण्यात आली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा उद्योजकांनी दिला आहे. दरम्यान, पायाभूत सुविधांप्रमाणेच विजेच्या समस्यांनी त्रस्त असलेल्या उद्योजकांना आता या नव्या त्रासाला सामोरे जावे लागणार आहे.

महापालिकेने पाठवलेल्या नोटीसनंतर पिंपरी-चिंचवड लघु उद्योजक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह पवारवस्ती, चिखली येथे बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीला पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, सचिव जयंत कड, उपाध्यक्ष संजय जगताप, माजी अध्यक्ष- सुरेश म्हेत्रे, संचालक नवनाथ वायाळ आदींसह संघटनेचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी उद्योजकांनी आंदोलनाचा इशारा दिला. चिखली, कुदळवाडी, पवारवस्ती, जाधववाडी या औद्योगिक परिसरात सुमारे दोन हजार लघुउद्योजकांकडे २० हजार कामगार काम करत आहेत. दीड लाख नागरिकांचा उदरनिर्वाह यावर अवलंबून आहे.

> गेल्या २५ ते ३० वर्षांपासून सुरू असलेले उद्योग आता अचानक महापालिकेला अनधिकृत दिसत आहेत. चुकीच्या पद्धतीने कारवाई करण्याची नोटीस बजावली आहे. विविध कर आकारताना महापालिकेने घेतले आहेत. ही कारवाई थांबवावी अन्यथा आम्ही शहर बंद आंदोलन करू.
>
> - संदीप बेलसरे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड लघुउद्योजक संघटना

गेल्या २५ वर्षांपासून या ठिकाणी अनेक उद्योग सुरू आहेत. एमआयडीसीकडे भूखंड उपलब्ध नसल्याने या परिसरात आर्थिक क्षमतेनुसार भूखंड घेऊन उद्योग सुरू केले आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिकेला मालमत्ता कर व इतर स्वरूपाचा महसूल देत आहेत. तसेच राज्य शासन व केंद्र शासन यांना वेगवेगळ्या स्वरूपाचा महसूल दिला जात आहेत. बँकांकडून कर्ज घेऊन उभारलेले उद्योग एका कारवाईमुळे डबघाईला येतील.

उद्योजकांना आत्महत्येशिवाय पर्याय राहणार नाही. त्यामुळे ही कारवाई न थांबल्यास तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. याबाबत महापालिकेचे साहाय्यक आयुक्त मनोज लोणकर यांच्याशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

# वाहतुक कोंडीवर मिळणार नियंत्रण; अतिक्रमणांवर होणार सर्जिकल स्ट्राईक

## पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांचा कडक इशारा; वाहतूक कोंडीबाबत माहिती घेऊन उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित विभागांना दिल्या

**पुणे | प्रतिनिधी**

वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरणारी वाहने, नो एन्ट्री, ट्रिपल सीट, अवैध वाहतुकीवर तसेच रस्त्याच्या कडेला वाहतुकीला अडथळा करणारी अतिक्रमणे संबंधित यंत्रणेच्या मदतीने सर्जिकल स्ट्राईक करून काढून टाकणार असल्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.



वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी कोणतीही हयगय केली जाणार नसल्याचा कडक इशारा त्यांनी दिला. वाहतूक कोंडीवर काय उपाययोजना केल्या याचा १० फेब्रुवारी रोजी पुन्हा आढावा आयुक्त कुमार घेणार आहेत. शिरूर-हवेली मतदारसंघातील शहरालगत येणाऱ्या गावांच्या ट्रॅफिक समस्या सोडविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक मंगळवारी (दि. २८) वाघोली येथे संपन्न झाली. बैठकीपूर्वी आयुक्त कुमार यांनी आमदार ज्ञानेश्वर कटके, विविध विभागाचे अधिकारी, ग्रामस्थांसह वाघोलीत प्रत्यक्ष उतरून वाहतूक कोंडीबाबत माहिती घेऊन उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित विभागांना दिल्या.

बैठकीला अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील, वाहतूक शाखेचे उपायुक्त अमोल झेंडे, परिमंडळ ४ चे उपायुक्त हिम्मत जाधव, पीएमपीएमएलच्या दीपा मुधोळ-मुंडे, महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, आरटीओ, महावितरण व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. उपस्थित नागरिकांनी यावेळी वाहतुकीला भेडसावणाऱ्या विविध समस्या मांडल्या.

संयुक्त बैठक आणि पाहणी दरम्यान विविध समस्या आणि त्या समस्यांचे निवारण कशाप्रकारे करता येईल यावर चर्चा झाली. दरम्यान चुकीच्या पद्धतीने थांबणाऱ्या ट्रॅव्हल्स, रिक्षा तसेच जड वाहने, रोडला असणारी अनधिकृत बांधकामे, रोडवर अडथळा निर्माण करणारे लाईटचे पोल, उडणारी धूळ, रस्त्याच्या उलटया दिशेने होणारी वाहतूक, ट्रिपल सीट्स, मद्यपान करून ड्रायव्हिंग तसेच इतरही अनेक समस्यांवर तोडगा काढण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना आयुक्त कुमार यांनी संबंधितांना दिल्या.

वाघोलीतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी आवश्यक कामांकरिता महापालिकेच्या बजेटमध्ये विशेष तरतूद करून सर्व कामे पूर्ण केली जातील. त्यासोबतच राज्य शासनाचा निधी कमी पडू देणार नाही. वाहतुकीला अडथळा ठरणारे कामे करण्याबाबत यापुढे संबंधित विभागांनी चालढकलपणा करू नये रस्ता दुरुस्ती व इतर कामांची अंमलबजावणी झालीच पाहिजे अशा स्पष्ट सूचना आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी बैठकीमध्ये दिल्या.

वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी कोणतीही हयगय केली जाणार नसल्याचा कडक इशारा त्यांनी दिला. वाहतूक कोंडीवर काय उपाययोजना केल्या याचा १० फेब्रुवारी रोजी पुन्हा आढावा आयुक्त कुमार घेणार आहेत , विविध विभागाचे अधिकारी, ग्रामस्थांसह वाघोलीत प्रत्यक्ष उतरून वाहतूक कोंडीबाबत माहिती घेऊन उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित विभागांना दिल्या.

ट्रॅव्हल्स बसेस नगररोडवर थांबायला नकोत नगर, मराठवाडा विदर्भात जाणाऱ्या बसेस प्रवाशांना घेण्यासाठी वाघोलीतील मुख्य चौकांमध्ये थांबत असल्याने वाहतुकीला अडथळा होऊन कोंडीमध्ये भर पडत असल्याची बाब प्रकर्षाने समोर येत असल्याने आयुक्त अमितेश कुमार यांनी आरटीओ व वाहतुक विभागाला सक्त सूचना देऊन एकही ट्रॅव्हल्सची बस पुणे-नगर रोडवर थांबणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सांगितले. बकोरी फाट्यालगत तयार करण्यात आलेल्या जागेमध्ये बसेस लागतील याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

### जबाबदारीच्या ढकला ढकलीने कामे रखडली

» पुणे-नगर महामार्गावर वाघोलीत वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महामार्गावरील रस्त्याची व इतर कामे करून घेण्याकरिता पोलीस विभाग आग्रही भुमिका घेऊन पाठपुरावा करीत असताना पुणे महापालिका, पीएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग सोयीस्करपणे एकमेकांवर ढकला ढकली करीत असल्याची बाब बैठकीमध्ये पुन्हा एकदा समोर आली. सर्व विभागांनी या कामासाठी एकत्रित काम करावे असे उपस्थितांनी सांगितले.

# एसटीच्या चुकीच्या नियोजनाचा नागरिकांना फटका; वारंवार तक्रार देऊनही उपाययोजना नाही

## ग्रामीण भागातील अनेक नागरिक आजही एस.टी.च्या प्रवासावर अवलंबून आहेत, परंतु वेळेवर गाडी येत नसल्याने हाल होत आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात एस.टी.च्या ढिसाळ नियोजनाचा फटका प्रवाशांना सहन करावा लागत असून एस टीच्या बिघडलेल्या वेळापत्रकाचा त्रास प्रवाश्यांसह विद्यार्थ्यांना सहन करावा लागत आहे. या संदर्भात पूर्व भागातील अनेक ग्रामपंचायतींनी वारंवार राजगुरूनगर आगार, मंचर आगार यांना निवेदन देऊन तक्रार केली आहे. परंतु त्यावर कुठलीच उपाययोजना होत नसून प्रवासी अक्षरशः वैतागले आहेत.



ग्रामीण भागातील अनेक नागरिक आजही एस.टी.च्या प्रवासावर अवलंबून आहेत. परंतु वेळेवर गाडी येत नसल्याने शिरदाळे,धामणी,पहाडदरा, लोणी,मांदळेवाडी परिसरातील प्रवाशांचे आणि विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. याबाबत धामणी व शिरदाळे सरपंच रेश्मा बोऱ्हाडे, सुप्रिया तांबे यांनी बऱ्याचदा पाठपुरावा केला आहे. परंतु यात सुधारणा होत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

आमचे विद्यार्थी रोज एस.टी. ची वाट पाहत असतात, पण वेळेवर कोणतीच गाडी येत नाही. एक दिवस आली तर दोन दिवस येत नाही,आली तरी मधेच बंद पडते. त्यामळे आमच्या विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत, असे शालेय विद्यार्थ्यांचे पालक देविदास रणपिसे यांनी सांगितले. तर काही एस.टी. जर खेडवरून वाफगाव गुळानी मार्गे आल्या तर जाताना पाबळ मार्गे जात आहेत.

त्यामुळे त्याचा देखील त्रास जास्त प्रमाणावर असल्याचे प्रवासी बाळासाहेब तांबे,तान्हाजी महाराज तांबे यांनी सांगितले. हवे तर एस.टी. मोजक्या सोडा पण त्या तरी वेळेवर सोडा. त्यामुळे प्रवाशांना त्यावर अवलंबून राहता येईल. तसेच ज्येष्ठ प्रवासी संख्या जास्त असेल तर वाहक आणि चालक त्यांच्याशी देखील चांगले वागत नाहीत. शिवाय त्यांना जर मोफत प्रवास असेल तर त्यांच्याशी बोलण्याची भाषा देखील सरळ नसते, अशी देखील काही प्रवाशांनी तक्रार केली आहे. त्यामुळे हे सर्व सुरळीत होण्याची गरज आहे.

> आज जरी एस.टी.ने प्रवास करणाऱ्यांची संख्या कमी असली तरी ग्रामीण भागात अनेक लोक एसटीच्या प्रवासावर अवलंबून असतात. त्यामुळे महामंडळाने कमीत कमी वेळेवर जर गाड्या सोडल्या तर त्याचा त्रास प्रवासी आणि विद्यार्थी यांना होणार नाही. त्यात एसटीने भाडेवाढ केली आहे. मग आपण सुविधा तरी योग्य द्या.त्यात ज्येष्ठ प्रवासी असतील त्यांच्याशी आदराने व्यवहार करा. ते फुकट जरी प्रवास करत असले तरी त्यांना शासनाने दिलेली ती सुविधा आहे.
>
> - मयुर सरडे, माजी उपसरपंच, शिरदाळे